जिल्हाधिकारी, धुळे निवासस्थाना शेजारील धुळे जिल्हा कारागृह मालकीची सीटी सव्हे क्र. ३५४५-अ मधील ९८३.६५ चौ.मी. इतके जमीन क्षेत्र रस्त्याच्या रुंदीकरणा करीता सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-०६१७/प्र.क्र.६१/तुरुंग-२

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ९ फेब्रुवारी, २०१८.

वाचा

१) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. इप्रवि/धुजिका/अतिक्रमण/३६७९/६६२७/२०१७/कक्ष-६(२)पुणे, दि. ०३.०८.२०१७ व दि. ०९.०१.२०१८ चे पत्र.

२) जिल्हाधिकारी,धुळे यांचे पत्र क्र. ब/कक्ष-१/बिनशेती/कावि/११०८/२०१७, दि. २२.११.२०१७.

प्रस्तावना-

जिल्हाधिकारी, धुळे निवासस्थानाशेजारील धुळे जिल्हा कारागृह मालकीची सीटी सर्व्हे क्र. ३५४५-अ मधील ९८३.६५ चौ.मी. इतके जमीन क्षेत्र रस्त्याच्या रुंदीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केल्यानुसार त्यांना उपलब्ध करुन देऊन, चेनलिंक फेंन्सिग करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. तसेच जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये महसूल व वन विभागास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाने सदर जागेचे प्रयोजन सार्वजनिक असून लोकहितास्तव जमीन रस्त्यासाठी अधिग्रहित करणेस हरकत नाही. तथापि, सदरची जमीन गृह विभागाच्या ताब्यात असून वाटपासाठी निर्बाधरित्या उपलब्ध नाही त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेले क्षेत्र ९८३.६५ चौ.मी. त्यांना उक्त प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी गृह विभागाकडून सरकार जमा करणेकामी महसूल विभागाने विनंती केली आहे. त्यानंतर सदर जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याची कार्यवाही महसूल व वन विभागाकडून करण्यात येणार आहे. ही बाब पहाता, जिल्हाधिकारी, धुळे निवासस्थानाशेजारील धुळे जिल्हा कारागृह मालकीची सीटी सर्व्हे क्र. ३५४५-अ मधील ९८३.६५ चौ.मी. इतके जमीन क्षेत्र रस्त्याच्या रुंदीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, धुळे निवासस्थानाशेजारील धुळे जिल्हा कारागृह मालकीची सीटी सर्व्हे क्र. ३५४५-अ मधील ९८३.६५ चौ.मी. इतके जमीन क्षेत्र जिल्हाधिकारी धुळे यांनी संदर्भातील क्र.२ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावात समाविष्ट केलेल्या नकाशाप्रमाणे रस्त्याच्या

रुंदीकरणाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरीत करण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

(१) कारागृहाचे उक्त जागेवर संरक्षित भिंत, चेन लिंक व धुळे कारागृह प्रवेशद्वार सार्वजनिक बांधकाम विभाग त्यांचे खर्चाने बांधून देईल.

(२) संरक्षित भिंत,चेनलिंक व प्रवेशद्वार याची संरचना अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा पुणे यांचेकडून मान्य करुन घ्यावे.

(३) गृह विभागाच्या पूर्व परवानगी शिवाय मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी या जागेचा वापर करता येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२१२०७५११४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Siddharth Vidyadhar Dhandore

Digitally signed by Siddharth Vidyadhar Dhandore
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=18c12c8352414c8a8937fd0998c9ca8d81b7ea489acfd971bb6de950e8d1d54f, serialNumber=5d16166df09e111cba9c7d5e4e321b340111df7b21c5b0fff0be638e80ea9a1b, cn=Siddharth Vidyadhar Dhandore
Date: 2018.02.12 12:12:43 +05'30'

(सि.वि.धांडोरे)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक (कारागृह), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. प्रधान सचिव (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई ३२.
३. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.
४. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय) , महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. जिल्हाधिकारी, धुळे.
७. कारागृह उपमहानिरीक्षक, (मध्य विभाग)/औरंगाबाद,
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे.
९. कारागृह अधिक्षक, धुळे.
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३.उप सचिव/अवर सचिव (पोल-७/बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१४.निवड नस्ती (तुरुंग-२).